① 15/09/2004

Form No:- 7865

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा २००४

अधिसूचना क्रमांक ३७४ (१) एक (१)/२००४/तीन.––महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांतर्गत खालील पदांवर भरती करण्यासाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-२००४ शनिवार, दिनांक ५ फेब्रुवारी २००५ व रविवार, दिनांक ६ फेब्रुवारी २००५ रोजी घेण्यात येईल. सदर परीक्षेची परीक्षा केंद्रे खालील परिच्छेद ५ मध्ये नमूद केली आहेत. सदर परीक्षा खालील दोन टप्प्यांत घेण्यात येईल :––

(अ) लेखी परीक्षा.

(ब) मौखिक व व्यक्तिमत्व चाचणी.

२. पदांची/सेवांची माहिती.––परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे भरण्यात येणाऱ्या पदांची/सेवांची माहिती खाली नमूद केली आहे :––

| अ. क्र. (१) | संवर्गाचे नाव व भरावयाची एकूण पदसंख्या (२) | | खुले (३) | अ. जा. (४) | अ. ज. (५) | वि.जा. (अ) (६) | भ.ज. (ब) (७) | वि.मा.प्र. (८) | भ.ज. (क) (९) | भ.ज. (ड) (१०) | इ.मा.व. (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | | | | | | | | | | |
| | (अ) सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (एकूण पदे ३१) | एकूण | .. | ७* | ३* | ३* | १* | १* | ३* | २* | ११* |
| | | महिला | .. | (२)* | (१)* | (१)* | .. | .. | (१)* | (१)* | (३)* |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण–अल्पदृष्टी–१ | | | | | | | | |
| | (ब) सहायक अभियंता, गट-अ, श्रेणी १ (एकूण पदे ८४). | एकूण | .. | १८* | १२* | ४* | ५* | २* | ६* | ५* | ३२* |
| | | महिला | .. | (५)* | (४)* | (१)* | (२)* | (१)* | (२)* | (२)* | (१०)* |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण (१) अल्पदृष्टी–१ (२) अल्पबहिरी–१ (३) अस्थिव्यंग(एका पायाने अधू)–१ | | | | | | | | |
| २ | पाटबंधारे विभाग | | | | | | | | | | |
| | (अ) सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (स्थापत्य) (एकूण पदे १६). | एकूण | ८ | २ | १ | .. | .. | .. | १ | १ | ३ |
| | | महिला | (२) | (१) | .. | .. | .. | .. | .. | .. | (१) |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण (१) अंशतः कर्णबधीर–१ | | | | | | | | |
| | (ब) सहायक अभियंता, गट-अ, श्रेणी १ (स्थापत्य) (एकूण पदे १३५). | एकूण | ६५ | १८ | ९ | ४ | ३ | ३ | ४ | ३ | २६ |
| | | महिला | (२०) | (५) | (३) | (१) | (१) | (१) | (१) | (१) | (८) |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण (१) अल्पदृष्टी-१, (२) अंशतः कर्णबधीर–१, (३) अस्थिव्यंग(एका पायाने अथवा एका हाताने अधू)–२ | | | | | | | | |
| | (क) सहायक अभियंता, (स्थापत्य) गट-ब, श्रेणी २ (एकूण पदे ७७*+२३६=३१३ पदे). | एकूण | ११८ | १६*+३१ | २२*+१६ | ४*+७ | ३*+६ | १*+५ | ५*+८ | ३*+५ | २३*+४० |
| | | महिला | (३५) | (९) | (५) | (२) | (२) | (२) | (२) | (२) | (१२) |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण (१) अल्पदृष्टी-२, (२) अंशतः कर्णबधीर ४*+२=६, (३) अस्थिव्यंग (एका पायाने अथवा एका हाताने अधू)–३*+३=६ | | | | | | | | |
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | | | | | | | | | | |
| | (अ) सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (एकूण पदे ३) | एकूण | .. | १* | १* | .. | .. | .. | .. | .. | १* |
| | | महिला | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | (ब) सहायक अभियंता, गट-अ, श्रेणी १ (एकूण पदे ४). | एकूण | .. | .. | १* | १* | .. | .. | १* | .. | १* |
| | | महिला | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | (क) सहायक अभियंता, (स्थापत्य) गट-ब, श्रेणी २ (एकूण पदे ३३). | एकूण | .. | .. | ५* | .. | १* | ३* | ५* | ४* | १३* |
| | | महिला | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | @ अपंगांसाठी आरक्षण (१) अस्थिव्यंग (एका पायाने अथवा एका हाताने अधू)–२ | | | | | | | | |

टिपा.—

(१) * अशी खूण दर्शविलेली पदे अनुशेषाची आहेत.

(२) प्रत्येक पदासमोरील कंसात त्या रकान्यातील एकूण पदांपैकी महिलांसाठी आरक्षित पदे दर्शविली आहेत.

(३) @ अपंगांसाठी असलेली पदे ही त्या संवर्गांच्या भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

(४) वर नमूद केलेल्या पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

(५) अपंगत्वाच्या प्रमाणाबाबतच्या तरतुदी अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ च्या कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(६) सार्वजनिक बांधकाम विभागातील व पाटबंधारे विभागातील पदांकरिता अनुक्रमे शासन निर्णय क्रमांक अपंग २००२/प्र.क्र./३२३/सेवा-३, दिनांक १८ डिसेंबर २००३ व क्रमांक संकीर्ण-१००३/(८२/२००३)/आ.(संनि.), दिनांक १३ मे २००४ नुसार पूर्ण अंध उमेदवार अपात्र आहेत.

(७) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन्न निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२, दिनाक २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

(अ) महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी समांतर राहील. तथापि, संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

(ब) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमिलेयर) महिला सदस्यांना तसेच, मागास प्रवर्गातील विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय नाही. यास्तव, महिला उमेदवारांनी त्या क्रिमिलेयरमध्ये मोडतात किंवा नाहीत ते अर्जात स्पष्टपणे नमूद करावे व सोबत आवश्यक अद्ययावत प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी सोबतच्या परिशिष्ट १० मधील नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे व इ.मा.व., भ.ज. (क) व भ.ज. (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी परिशिष्ट ६ मधील नमुन्यात जातीचे वैध प्रमाणपत्र सादर करावे.

(क) खुल्या प्रवर्गातील, वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) वि.मा.प्र. व इ.मा. व मधील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी त्या क्रिमिलेयर गटात मोडत नसल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर २००४ रोजी वैध असलेले अद्ययावत प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. **जातीचे प्रमाणपत्र तसेच, नॉन-क्रिमिलेयर बाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावाचे असणे आवश्यक राहील. सदरहू प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावाचे नसल्यास त्या वर्गवारीकरिता उमेदवाराचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.** नॉन क्रिमिलेयर गटात मोडणाऱ्या महिला उमेदवार तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिला उमेदवार लेखी परीक्षेत केवळ महिलांसाठी विहित केलेल्या निम्न अर्हतामानानुसार अर्हताप्राप्त झाल्यास त्यांची उमेदवारी सर्वसाधारण पदांसाठी तसेच संबंधित वर्गवारीच्या पदांसाठी विचारात घेतली जाणार नाही.

(ड) मागासवर्गीय प्रवर्गातील महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यांनी त्यांच्या संबंधित जातीच्या वैध प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. जर अशा महिला त्यांच्या संबंधित जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करू इच्छित नसतील किंवा सादर करू शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच क्रिमिलेयरमध्ये मोडत नसल्याबाबतचे दिनांक २७ ऑक्टोबर २००४ रोजी वैध असलेले अद्ययावत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(इ) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे/कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न मागील सलग तीन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी रुपये तीन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. अशा व्यक्तींना आरक्षणाच्या कोणत्याही सवलती मिळणार नाहीत. यासंदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहित महिलेच्या बाबतीत पती व मुले यांचा समावेश राहील आणि अविवाहित मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहित भावंडे यांचा समावेश राहील.

(फ) **महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.**

(८) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रमांक ४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमि लेअर) तत्व अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) तत्व वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. या तरतूदीनुसार वि.जा. (अ), भ.ज. (ब) व विशेष मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत वर्गामध्ये (क्रिमी लेअर) मोडत नाहीत, असे अर्जामध्ये स्पष्ट नमूद करावे व त्याबाबतचे वचनपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच या तरतुदीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबतचे शासनाचे नियम/आदेश जारी झाल्यानंतर विहित प्रमाणपत्र सादर करावे.

(९) भज (क), भज (ड) विमाप्र व इमाव उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र उमेदवारांच्या नावाचे व अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास वैद्य असलेले अद्ययावत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(१०) आरक्षित पदांकरिता महाराष्ट्र राज्यातील अधिवासी (डोमिसाईल्ड) असलेल्या उमेदवारांचाच विचार केला जाईल. **सदर अधिवास प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांच्या नावाने असणे आवश्यक राहील.** उन्नत व प्रगत व्यक्ती/गटात (क्रिमिलेयर) मध्ये मोडणाऱ्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या वर्गवारीच्या उमेदवारांचा आरक्षित असलेल्या पदांसाठी विचार केला जाणार नाही. तसेच, त्यांना उच्च वयोमर्यादेची व परीक्षा शुल्कातील सवलत लागू असणार नाही. या वर्गवारीच्या उमेदवारांनी अर्जामध्ये समाजातील उन्नत व प्रगत गटात मोडत नाही असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. असे न केल्यास त्याचा विजा (अ), भज (ब), भज (क), भज ड, विमाप्र व इमाव चा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. तथापि, अशा उमेदवारांनी अमागास उमेदवारांसाठी आवश्यक संपूर्ण परीक्षा शुल्क पाठविले असल्यास ते खुल्या गटातील समजण्यात येतील.

(११) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग,भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील नॉन क्रिमिलेयर गटात मोडणारे उमेदवार तसेच अपंग उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न अर्हतामानानुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या निकालाच्या वेळी त्यांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदांसाठी विचारात घेतली जाणार नाही.

३. या अधिसूचनेमध्ये महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा सविस्तर तपशील परिशिष्ट-३ मध्ये दिलेला आहे. या अधिसूचनेच्या प्रतीसोबत छापील आवेदनपत्र पुरविण्यात येईल.

४. **परिशिष्टे.**—

परिशिष्ट-१.—परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी, राष्ट्रीयत्व, शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा इ. संबंधीची माहिती.

परिशिष्ट-२.—वेतनश्रेणीसह पदांचा संक्षिप्त तपशील.

परिशिष्ट-३.—लेखी परीक्षेचे विषय, गुण, मानक (दर्जा), माध्यम व सविस्तर अभ्यासक्रम संबंधीची माहिती.

परिशिष्ट-४ ते ९.—वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्राचा तसेच जातीच्या प्रमाणपत्राचे नमुने.

परिशिष्ट-१०.—खुल्या प्रवर्गातील महिलांसाठीचे नॉनक्रिमिलेयरचे प्रमाणपत्र.

परिशिष्ट-११.—वचनपत्राचा नमुना.

५. **परीक्षा केंद्रे.**—परीक्षा खाली नमूद केलेल्या केंद्रांवर घेण्यात येईल :—

| केंद्र | केंद्राचा संकेतांक | केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १५ | नागपूर | ३२ |
| मुंबई | २९ | पुणे | ३८ |

**टिपा.**—

(१) जर एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही, तर त्या केंद्रातील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(२) अर्जात एकदा नमूद केलेल्या केंद्र संकेतांकानुसार प्रवेश दिल्यावर कोणत्याही कारणास्तव त्यात बदल करण्याची विनंती मान्य करण्यात येणार नाही.

६. (अ) तीनही विभागातील एका पदासाठी किंवा अधिक वा सर्व पदांसाठी स्पर्धा करू इच्छिणाऱ्या उमेदवाराने या परीक्षेकरिता **एकच अर्ज** करावा. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास एकच वैध अर्ज विचारात घेण्यात येईल. याबाबतचा आयोगाचा निर्णय उमेदवारावर बंधनकारक राहील.

(ब) आयोगाने पुरविलेल्या विहित नमुन्यात अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या अर्जाचाच या परीक्षेसाठी विचार केला जाईल.

(क) **परीक्षेस प्रवेश देण्याबाबतच्या शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा इत्यादी.**—संबंधित माहिती परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आली आहे. परिशिष्ट -२ मध्ये वेतन श्रेणीसह पदाचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. परिशिष्ट-३ मध्ये परीक्षेचे विषय, मानक (दर्जा), माध्यम आणि अभ्यासक्रम दिलेला आहे.

७. **वर्गवारी व मागासवर्गीय दावा.**—(अ) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक बीसीसी-१०९३/२१६७/सी.आर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४ नुसार उमेदवार अमागास असल्यास अथवा शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/प्रकरण क्रमांक ८६/मावक-५, दिनांक १६ जून, १९९४ नुसार उमेदवार, धनगर व तत्सम [भ.ज. (क)] किंवा वंजारी व तत्सम [भ.ज. (ड)] किंवा इतर मागासवर्गामधील असल्यास अथवा शासनाच्या सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील नियम क्रमांक ४ (२) (दोन) खालील परंतुकानुसार उमेदवार वि.जा. (अ), भ.ज. (ब) व विशेष मागास प्रवर्गातील असून उन्नत व प्रगत गटात (Creamy layer) मोडत असल्यास, त्यांना मागासवर्गीयांसाठीच्या सवलती लागू नसल्याने त्यांनी अर्जातील बाब क्रमांक ७ समोर " अमागास " च्या चौकोनात व मागासवर्गातील उमेदवारांनी ते कोणत्या गटात मोडतात ते दर्शविण्यासाठी संबंधित चौकोनात ( √ ) अशी खूण करावी व अर्जातील बाब क्रमांक ८ व ९ समोर जात/जमात नमूद करावी. तर नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार मागासवर्गात मोडत असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत, सोबतच्या परिशिष्ट ४ ते ९ मध्ये दिलेल्या नमुन्यातील त्यांना लागू असलेल्या नमुन्यात विहित प्राधिकाऱ्यांकडून घेतलेले जातीचे अद्ययावत प्रमाणपत्रांची तसेच वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत व्यक्ती/गटात न मोडणाऱ्या (नॉनक्रिमिलेअर) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या वर्गवारीच्या उमेदवारांनी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे दिनांक २७ ऑक्टोबर २००४ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र तसेच, नॉन क्रिमीलेअर बाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावाचे असणे आवश्यक राहील. सदरहू प्रमाणपत्र उमेदवाराच्या नावाचे नसल्यास त्या वर्गवारीकरिता उमेदवाराचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

(ब) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रमांक ४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे

(क्रिमि लेअर) तत्व अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) तत्व वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. या तरतुदीनुसार वि.जा. (अ), भ.ज. (ब) व विशेष मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत वर्गामध्ये (क्रिमी लेअर) मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्ट नमूद करावे व त्याबाबतचे वचनपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच या तरतुदीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबतचे शासनाचे नियम/आदेश जारी झाल्यानंतर विहित प्रमाणपत्र सादर करावे.

(क) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सी.बी.सी.-१०९८/प्र.क्र. १५१/मावक-५, दिनांक ७ मे १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणाऱ्या मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी आवेदनपत्र सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

(ड) परीक्षेसाठी एकदा निवडण्यात आलेले परीक्षा केंद्र, जातीचा तसेच अपंगत्वाचा दावा यामध्ये मागाहून कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. म्हणून उमेदवाराने आयोगास आवेदनपत्र सादर करताना आपल्या निवडीचे परीक्षा केंद्र, आपली जातीची तसेच अपंगत्वाची वर्गवारी अचूक दर्शविली आहे याची खात्री करून घ्यावी. परीक्षेचा अर्ज करताना जातीचे अथवा अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याची सबब सांगून उमेदवाराने अमागास अथवा इतर कोणतीही वर्गवारी नमूद न करता आपली जी वर्गवारी आहे, तीच वर्गवारी नमूद करून त्याप्रमाणे प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा उपरोल्लेखित परिच्छेद ७ मधील विनिर्दिष्ट तरतुदीनुसार उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८. **शुल्क (फी).**---विहित अर्जातील बाब क्र. ७ नुसार दर्शविलेल्या त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे :—

| प्रवर्ग | परीक्षा शुल्क<br>रुपये |
|---|---|
| (१) अ. जा., अ. ज., करिता .. .. | १०० |
| (२) वि. जा. (अ), भ. ज. (ब), भ. ज. (क), भ. ज. (ड) व इ. मा. व. प्रवर्गामधील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नाहीत म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाखापेक्षा कमी आहे व त्यांच्याकडे तसे प्रमाणपत्र आहे अशांकरिता. | १०० |
| (३) वि. जा. (अ), भ. ज. (ब), भ. ज. (क), भ. ज. (ड) वि.मा.प्र. आणि इ. मा. व. प्रवर्गातील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडतात म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाखापेक्षा अधिक आहे त्यामुळे आरक्षणाचा लाभ मिळण्यास पात्र नसल्याने अशांकरिता. | २५० |
| (४) सर्व अमागास उमेदवार तसेच अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या ३० टक्के राखीव जागांकरिता अर्ज करणाऱ्या उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३ लाखापेक्षा कमी आहे व त्यांच्याकडे जरी तसे प्रमाणपत्र असले तरी अशा अमागास महिलांकरिता. | २५० |

परीक्षा शुल्क महाराष्ट्र राज्याचे कोर्ट फी स्टॅम्पच्या स्वरूपात भरणे आवश्यक आहे. हे स्टॅम्प त्यावर स्वतःचे नाव व ठिकाण लिहून छापील आवेदनपत्रावर तरतूद केलेल्या जागेवर आवेदन पत्रावरून निघणार नाहीत अशाप्रकारे घट्ट चिकटवावेत. आवेदनपत्रांसोबत सुटे वा टाचणीने जोडलेले कोर्ट फी स्टॅम्प गहाळ झाल्यास ते अर्ज विनाशुल्क समजून नाकारले जातील व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर राहणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत किंवा ऐनवेळी कोर्ट फी स्टॅम्प मिळविणे अशक्य असेल अशा अत्यंत अपवादात्मक प्रकरणी परीक्षा शुल्क. " सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई " यांच्या नावाने रेखित केलेल्या इंडियन पोस्टल ऑर्डरच्या स्वरूपात पाठवता येईल. तथापि, प्रस्तुत शुल्क दुसऱ्या कोणत्याही स्वरूपात स्वीकारले जाणार नाही म्हणजेच कोर्ट फी स्टॅम्प ऐवजी स्टॅम्प पेपर, रेव्हेन्यु स्टॅम्प, केंद्रीय शुल्काचे स्टॅम्प, पोस्टाची तिकिटे किंवा बँक ड्राफ्ट इ. दुसऱ्या कोणत्याही स्वरूपातील शुल्कासह सादर केलेले आवेदनपत्र नाकारण्यात येतील. आयोगास प्राप्त झालेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

९. **आवेदनपत्रावर चिकटविलेल्या छायाचित्राबाबत.**---उमेदवाराने ओळखपत्रातील छायाचित्राइतक्या आकाराच्या अलिकडच्या काळातील स्वतःच्या छायाचित्राच्या दोन प्रती तयार ठेवून त्यांपैकी एक आवेदनपत्रावर विहित जागी चिकटवावे. छायाचित्राच्या प्रती आवेदनपत्राच्या तारखेपासून सहा महिन्यांपूर्वी/पर्यंत काढलेल्या व तेव्हा परीक्षेच्या वेळी किंवा उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळी उमेदवारांच्या स्वरूपाशी जुळणाऱ्या असाव्यात. **या दोन छायाचित्रांच्या प्रतींपैकी दुसरी प्रत** उमेदवाराने तूर्त स्वतःजवळ ठेवून मुलाखतीस बोलविण्यास उमेदवार अर्हताप्राप्त ठरल्यास त्यावेळी सादर करावयाच्या **सारांशपत्रास चिकटवावयाची आहे.** उमेदवाराची प्रस्तुत छायाचित्रे एकाच वेळी काढलेली असावीत.

१०. **अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती.---खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती उमेदवारास लागू असेल त्याप्रमाणे, अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे. तसेच मुलाखतीच्या दिवशीच आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे उमेदवारांनी सादर करणे आवश्यक राहील.**

✓(१) **शैक्षणिक अर्हता, इत्यादींचा पुरावा.**---उमेदवाराने सांविधिक/मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी अथवा त्या पदवीशी शासनाने मान्यता दिलेली तत्सम अशी कोणतीही अन्य अर्हतेची प्रत, उदा. पदवी प्रदान केली असल्यास तिची प्रत पाठवावी. विद्यापीठातर्फे पदवी प्रदान झाली नसल्याकारणाने जर उमेदवार पदवी प्रत पाठविण्यास असमर्थ असेल तर त्याने विद्यापीठाकडून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यासंबंधीचे तात्पुरते प्रमाणपत्र किंवा परीक्षेत मिळालेल्या गुणांचा तक्ता याची प्रत पाठवावी व त्यासोबत पदवी प्रदान झाल्यानंतर लगेच पदवीची प्रत पाठविण्यात येईल असे हमीपत्र द्यावे.

पदवीच्या प्रतीऐवजी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यासंबंधी महाविद्यालयातील प्राचार्याचे दिलेले पत्र/ज्ञापन अथवा अन्य पुरावा कोणत्याही परिस्थितीत आयोगाकडून स्वीकारला जाणार नाही.

(२) **मराठीचे ज्ञान असल्याचा दाखला.**––(एक) माध्यमिक शालान्त परीक्षा किंवा मॅट्रीक्यूलेट विद्यापीठाची उच्च परीक्षा मराठी विषयासह उत्तीर्ण असल्याचा एस. एस. सी. बोर्ड किंवा विद्यापीठाने दिलेला दाखला, अथवा

(दोन) उमेदवारांस मराठी भाषा चांगल्याप्रकारे लिहिता, वाचता वा बोलता येते यासंबंधी मराठीचे पुरेसे ज्ञान असल्याबाबत विद्यापीठात मराठी भाषा शिकविणाऱ्या प्राध्यापकाचा, त्यावर प्राचार्याची प्रतिस्वाक्षरी असलेला दाखला.

(३) **वयाचा दाखला.**––(अ) एस. एस. सी. बोर्डाने दिलेल्या एस. एस. सी. परीक्षेच्या दाखल्याची प्रत किंवा परिशिष्ट ४ मध्ये दिलेल्या नमुन्यातील जिल्हा दंडाधिकारी अथवा मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी अधिकार दिलेले कार्यकारी दंडाधिकारी वा मुख्य महानगर दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याची प्रत पाठविणे आवश्यक आहे. इतर प्रतिज्ञापत्र वा शाळा सोडल्याचा दाखला हे जन्मतारखेचा दाखला म्हणून वरील दाखल्याऐवजी आयोग स्वीकारणार नाही.

(ब) शासनाच्या स्थायी सेवेत असलेले उमेदवार वरील दोनपैकी कोणत्याही दाखल्याची प्रत किंवा त्यांच्या सेवेतील रेकॉर्डमध्ये जी जन्मतारीख नोंदविली असेल तिच्या उताऱ्याची विभाग प्रमुखांनी सांक्षांकित केलेली प्रत सादर करु शकतात.

(क) सवलतपात्र माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांनी उच्च वयोमर्यादेची सवलत मिळण्याचा दावा केला असल्यास त्याबाबतच्या पुराव्यादाखल संरक्षण दलाने दिलेले "कार्यमुक्तीचे वैध प्रमाणपत्र" (Discharge Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

(४) **मागासवर्गीय उमेदवार असल्याचा दाखला.**––राज्य शासनाने त्यांच्या नियंत्रणाखालील पदे भरण्याकरिता ज्या मागासवर्गीय जातीस मान्यता दिली आहे. त्यातील जे उमेदवार विमुक्त जाती (अ) व भटक्या जमाती (ब) मध्ये मोडत असल्याचा दावा करतात त्यांनी परिशिष्ट-५ मध्ये तर धनगर व तत्सम [भ. ज. (क)], वंजारी व तत्सम [भ. ज. (ड)] आणि इतर मागासवर्गातील उन्नत व प्रगत गटात (Creamy Layer) न मोडणाऱ्या उमेदवारांनी परिशिष्ट ६ मध्ये दाखविल्याप्रमाणे जातीच्या अद्ययावत दाखल्याची प्रत पाठवावयास पाहिजे. राज्य शासनाने त्यांच्या नियंत्रणाखालील ज्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस मान्यता दिली आहे, त्याबाबतचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी परिशिष्ट ७/परिशिष्ट ८ मध्ये (लागू असेल त्यानुसार) दाखविलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत पाठवावी. विशेष मागास-प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी परिशिष्ट ९ मध्ये दाखविलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत पाठवावी. हे जातीचे दाखले जिल्हादंडाधिकारी किंवा ज्याला हे दाखले देण्याचे अधिकार दिलेले आहेत अशा सक्षम प्राधिकाऱ्याकडूनच मिळवावयास पाहिजे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रमांक ४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमि लेअर) तत्व अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) तत्व वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागू आहे. या तरतुदीनुसार वि.जा. (अ), भ.ज. (ब) विशेष मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत वर्गामध्ये (क्रिमी लेअर) मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्ट नमूद करावे व त्याबाबतचे वचनपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच या तरतुदीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबतचे शासनाचे नियम/आदेश जारी झाल्यानंतर विहित प्रमाणपत्र सादर करावे. त्याबाबतचे वचनपत्र उमेदवारांनी परिशिष्ट ११ मधील नमुन्यात सादर करावे.

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एस. टी. सी. १६९६/प्र.क्र. ३४/का-१०, दिनांक ७ मार्च, १९९६ व शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक पीबीसी. १०९६/प्र.क्र. ४८/मावक-५, दिनांक ३ जून, १९९६ अन्वये खाली नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांना अनुक्रमे अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे दाखले देण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच, ज्या जातींना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचा दाखला सादर करावा लागतो, त्यांना असा दाखला निर्गमित करण्यासाठी देखील उक्त दिनांक ३ जून १९९६ च्या शासन निर्णयान्वये सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे :—

(अ) संबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल),

(ब) उप जिल्हाधिकारी, किंवा

(क) जिल्हाधिकारी.

उपरोक्त सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या सही व शिक्क्यांचे (उप विभागीय अधिकारी, उप जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी असा शिक्का मारलेले) दाखलेच वैध समजण्यात येतील. परंतु, दिनांक ३ जून १९९६ पूर्वी तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी प्रदान केलेले जातीविषयक प्रमाणपत्र शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सी.बी.सी. १०९६/प्र.क्र. ४८/मावक-५, दिनांक १३ सप्टेंबर १९९६ अन्वये ग्राह्य धरण्यात येईल.

मागासवर्गीय उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचा दाखला देणे आवश्यक आहे. तथापि, त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबाचे महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य [Ordinarily reside(s)] अशा आशयाची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहणार नाही.

(५) **महिला उमेदवारांच्या बाबतीत.**---(अ) खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी सोबतच्या परिशिष्ट १० मधील नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रदान केलेले अद्ययावत वैध प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

(ब) मागासवर्गीय प्रवर्गातील महिला उमेदवारांनी वरील परिच्छेद २ खालील टीप क्रमांक (७) (ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अद्ययावत वैध प्रमाणपत्र सादर करावे.

(क) महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचा दाखला देणे आवश्यक आहे.

(ड) विवाहित महिलांनी पुर्वाश्रमीच्या नावाचे (by birth) जातीचे प्रमाणपत्र तर विवाहानंतरच्या नावाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

(६) **भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून आलेले नवीन निवासी असल्यासंबंधीचा दाखला.**---भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून आलेले नवीन निवासी यांच्याकरिता राज्य शासनाच्या वयोमर्यादेतील व शुल्क माफीच्या सवलतीकरिता पात्र करण्याकरिता ते दिनांक १ जानेवारी १९६४ रोजी व नंतर भारतामध्ये निवासी म्हणून आश्रयास आले आहेत हे दाखविणारा आणि त्यांच्या मूळच्या स्थाना संबंधीचा जिल्हा न्यायाधीश किंवा संबंधित रिलिफ कॅम्पचे कमांडंट यांच्या दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(७) **श्रीलंकेतून परत आलेले भारताचे मूळ रहिवासी असल्यासंबंधीचा दाखला.**---श्रीलंकेतून परत आलेले भारताचे मूळ नागरिक यांच्याकरिता राज्य शासनाने मंजूर केलेल्या वयोमर्यादेतील व आवेदन शुल्क माफी या सवलतींचा लाभ घेण्याकरिता ज्या उमेदवारांनी तसा दावा केला असेल अशा उमेदवारांनी श्रीलंकेतील भारताच्या उच्चायुक्तांकडून ते भारताचे मूळ नागरिक असून ऑक्टोबर, १९६४ च्या भारत-सिलोन करारानुसार दिनांक १ नोव्हेंबर १९६४ ला व नंतर त्यांनी भारतात स्थलांतर केले असून ते भारताचे नागरिक आहेत असा दाखला सादर करावा. तसेच, त्यांनी विहित फी भरू शकत नाही अशासंबंधीचा जिल्हाधिकारी किंवा राजपत्रित अधिकारी किंवा संसद किंवा राज्य विधानसभा सदस्य याच्यांकडून मिळविलेल्या दाखल्याची प्रत जोडावी.

(८) **ब्रम्हदेशातून परत आलेले भारताचे मूळ रहिवासी असल्यासंबंधीचा दाखला.**---ब्रम्हदेशातून परत आलेले भारताचे मूळ नागरिक यांच्याकरिता राज्य शासनाने मंजूर केलेल्या वयोमर्यादेतील व आवेदन शुल्क माफी या सवलतीचा लाभ घेण्याकरिता उमेदवारांनी तसा दावा केला असल्यास अशा उमेदवारांनी ते भारताचे मूळ नागरिक असून ते १ जून १९६३ नंतर त्यांनी भारतात स्थलांतर केले असल्याचा भारतीय राजदूतावास, रंगून यांच्याकडून मिळालेल्या ओळखपत्राच्या दाखल्याची संबंधित प्रमाणित प्रत पाठवावी किंवा ते रंगूनमधील खरेखुरे स्वदेश प्रत्यावर्तीत असून त्याने भारतात दिनांक १ जून १९६३ किंवा तदनंतर स्थलांतर केले असल्याच्या संबंधित क्षेत्राच्या जिल्हा न्यायाधीश यांनी दिलेल्या दाखल्याची प्रत जोडावी.

(९) **विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह झाल्यावर त्यांच्या नावात बदल झाला असल्याचा दाखला.**---विवाहित स्त्रियांच्या बाबतीत दाखल्यात पूर्वाश्रमीचे नाव असल्यास त्यांनी विवाह प्रबंधक वा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीच्या दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. अथवा **शासन राजपत्रात** तशी प्रसिद्ध केलेली अधिसूचनेची प्रत सादर करावी.

(१०) **अपंगत्वाचा दाखला.**---(अ) शारीरिकदृष्ट्या अपंग उमेदवारांच्या बाबतीत ते शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याचे महाराष्ट्रातील शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न असणाऱ्या रुग्णालयाच्या बाबतीत वैद्यकीय अधीक्षक (Medical Superintendent) यांचे वरील परिच्छेद २ खालील टीप (६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अद्ययावत वैध प्रमाणपत्र सादर करावे.

(ब) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ च्या कलम २(टी) मधील तरतुदीनुसार अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असल्याशिवाय अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर दावा करता येणार नाही. तसेच, किमान ४० टक्के अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरसुद्धा सदर उमेदवार शिफारस पात्र ठरल्यास संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून करून घेण्यात येईल.

(क) अपंग आरक्षण हे सार्वजनिक बांधकाम विभागाचा व पाटबंधारे विभागाचा अनुक्रमे शासन निर्णय क्र. अपंग २००२/प्र.क्र. ३२३/सेवा-३, दिनांक १८ डिसेंबर २००३ व क्र. संकीर्ण-१००३/(८२/२००३)/आ(संनि), दिनांक १३ मे २००४ नुसार राहील.

(११) विद्यापीठाच्या परीक्षेत प्राविण्य मिळविले असल्याच्या दाखल्याची प्रत.

(१२) शाळा/महाविद्यालय/विद्यापीठात असताना उमेदवाराने पाठ्येत्तर कार्यक्रमात भाग घेतला असल्यास त्यासंबंधीच्या दाखल्याची प्रत.

११. **अर्ज पाठविण्याची पद्धत व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक.**---(१) एका किंवा दोन्ही पदांसाठी/सेवांसाठी स्पर्धा करू इच्छिणाऱ्या उमेदवाराने एकच अर्ज सादर करावा व एकेरीचे शुल्क भरावे. अर्जाच्या परिच्छेद-३२ मध्ये पसंतीक्रम नमूद केला आहे त्यासमोर उमेदवाराने या अधिसूचनेच्या परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाचे/पदांची नावे त्यांनी त्यांच्या पसंतीनुसार नमूद करावीत. परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या पदांव्यतिरिक्त अन्य पदांची नावे तेथे लिहिल्यास त्या पदांसाठी त्यांच्या उमेदवारीचा विचार केला जाणार नाही.

सर्व उमेदवारांनी वर नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे अर्ज भरुन बंद केलेला लिफाफा त्यावर **' महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-२००४** साठी अर्ज ' असे स्पष्ट नमूद करुन '' उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, विक्रीकर भवन (जुनी इमारत), ९ वा मजला, कक्ष-९०४, सरदार बलवंतसिंह दोधी मार्ग (नेसबिट रोड), माझगाव, मुंबई-४०० ०१० '' या पत्त्यावर अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजे दिनांक २७ ऑक्टोबर २००४ रोजी किंवा तत्पूर्वी पोहोचेल अशा बेताने पाठवावा. टपालाने अर्ज पाठविताना भारतीय टपाल सेवेमार्फत पाठवावा. खाजगी संस्थेद्वारे किंवा कुरिअर संस्थेद्वारे बंद पाकीटातून अर्ज पाठविल्यास अर्जाची पोच दिली जाणार नाही किंवा आयोगाकडे दिल्याचा त्यासंस्थेने दिलेला कोणताही पुरावा ग्राह्य धरला जाणार नाही.

(२) आयोगाच्या माझगाव येथील कार्यालयात व्यक्तीशः येवून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने कार्यालयातील फलकावर दिनांक २७ ऑक्टोबर २००४ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज द्यावा व त्यांची नोंदवहीत नोंद घेण्यात आली आहे याची खात्री करून घ्यावी. मागणी केल्यास उमेदवारास त्याच्या अर्जाची पोच पावती सुद्धा त्यावेळी देण्यात येईल. जे उमेदवार पोच देय डाक नोंद टपालाने अर्ज पाठवितात त्यांना अर्जाची पोच पोस्टातर्फे परस्पर मिळते. परंतु जे उमेदवार साध्या टपालाने अर्ज पाठवतील त्यांनी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड त्यावर **'' महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-२००४** करिता अर्ज '' असे लिहून पोस्टकार्ड अर्जाला जोडून पाठविल्यास '' अर्जाचा स्वीकृती क्रमांक '' त्यांना त्या पोस्टकार्डद्वारे कळविण्यात येईल. मात्र हे पोस्टकार्ड अर्जाची पोच एवढ्याच उद्देशाकरिता वापरले जाईल. त्याचा प्रवेशपत्र म्हणून वापर करता येणार नाही. तसेच जरी अर्ज-स्वीकृती क्रमांक पोस्टकार्ड वरून कळविला असला तरी नंतर असा अर्ज अधिसूचनेतील परिच्छेद-१२ मध्ये नमूद केलेल्या दोषांपैकी सदोष आढळल्यास नाकारला जाण्याची शक्यता आहे, याचीही नोंद घ्यावी. **अर्ज स्वीकृती क्रमांक कळविण्याची सोय करण्यात आली असल्याने आयोगाच्या कार्यालयात फलकावर एक गठ्ठा अर्ज आणून दिले तर ते स्वीकारले जाणार नाहीत, याचीही सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.** उमेदवाराने कुरिअर मार्फत अर्ज पाठविल्यास व पोच पावतीची मागणी केल्यास त्यासाठी कुरिअरने आयोगाच्या विहित नमून्यातील पोचपावती भरणे आवश्यक राहील व अशा पोचपावतीसह बंद लिफाफा उघडून त्यामधील अर्ज फलकावर सादर केल्यास पोच देण्यात येईल. कुरिअरच्या कोणत्याही पोचपावतीवर पोच दिली जाणार नाही. या संदर्भात उमेदवारांच्या कोणत्याही तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही. टपाल खात्याची दिरंगाई वा अन्य कोणत्याही परिस्थितीमध्ये **दिनांक २७ ऑक्टोबर २००४ नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.** त्याकरिता उमेदवारांनी अर्ज अत्यंत तत्परतेने भरून पाठविणे त्याच्या हिताचे राहील.

(३) अर्ज स्वीकारण्याच्या विहित केलेल्या अंतिम तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. म्हणून उमेदवाराने शेवटच्या तारखेपर्यंत न थांबता शक्यतो सुरुवातीसच आवेदनपत्रे पाठवावीत.

(४) (अ) आवेदनपत्राच्या संदर्भातील सर्व पत्रव्यवहार **'' उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, विक्रीकर भवन (जुनी इमारत), ९ वा मजला, कक्ष-९०४, सरदार बलवंतसिंह दोधी मार्ग (नेसबिट रोड), माझगाव, मुंबई-४०० ०१० ''** यांच्याशी करावा. पत्रात परीक्षेचे नाव व आवेदनपत्र सादर केल्याचा दिनांक नमूद करावा. आयोगाने आवेदनपत्राचा संदर्भ क्रमांक पुरविल्यानंतर तो क्रमांक उमेदवाराने न चुकता नंतरच्या पत्रव्यवहारात नमूद करावा. ज्या पत्रव्यवहारात वर नमूद केलेली माहिती नसेल त्या पत्राची दखल घेतली जाणार नाही.

(ब) फॅक्सद्वारे आयोगाकडे करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहाराच्या बाबतीत फॅक्समधील मसूदा संदर्भासहित सुस्पष्ट असावा. तसेच, फॅक्सच्या पाठोपाठ सविस्तर पत्र पाठविण्यात यावे अन्यथा फॅक्सची दखल घेतली जाणार नाही.

१२. **सदोष अर्ज.**— खाली नमूद केलेल्या कारणामुळे सदोष अर्ज नाकारले जातील व त्याबाबतचा आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

(१) अर्ज आयोगाने पुरविलेल्या विहित नमुन्यात नसल्यास,

(२) अर्जावर स्वतःचे छायाचित्र चिकटवलेले नसल्यास,

(३) अर्जाच्या पहिल्या पानावरील (मुखपृष्ठावरील)स्वाक्षरीच्या चौकटीत स्वाक्षरी नसल्यास

(४) सुवाच्य नसलेले, अपूर्ण किंवा चुकीची माहिती भरलेले किंवा मराठी व इंग्रजी स्वाक्षरी नसलेले.

(५) आवश्यक रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प न जोडलेले किंवा कोर्ट फी स्टॅम्प ऐवजी स्टॅम्प पेपर/रेव्हेन्यू स्टॅम्प/ पोस्टाची तिकीटे/डिमांड ड्राफ्ट/केंद्रीय भरती शुल्क स्टॅम्प इत्यादी जोडलेले अर्ज.

(६) परीक्षा केंद्राचा संकेतांक (कोड नंबर) अजिबात नमूद न केलेले वा चुकीचे संकेतांक नमूद केलेले अर्ज.

(७) अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखेनंतर म्हणजे दिनांक २७ ऑक्टोबर २००४ नंतर आलेले अर्ज.

(८) तरतुदीनुसार आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती नसल्यास.

१३. **अर्ज भरताना घ्यावयाची दक्षता.**—(अ) उमेदवाराचे अर्ज हे संगणक संस्थेकडे पुढील प्रक्रियेकरिता पाठवावे लागत असल्याने चुकीचे भरलेले अर्ज आपोआपच नाकारले जातील. यास्तव उमेदवारांनी अर्ज भरतांना अर्जातील नोंदी काळजीपूर्वक वाचून भराव्यात.

**(ब) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अपंगत्वाचे, वय तसेच आवश्यक संगणक ज्ञानाच्या दाखल्याच्या प्रती जोडणे आवश्यक आहे. या प्रतीशिवाय सादर केलेले अर्ज नाकारले जातील. उमेदवार पात्रताविषयक एखाद्या सवलतीचा दावा करीत असेल तर त्याने/तिने त्यापृष्ठ्यर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्राची प्रतही अर्जासोबत जोडावी. अर्जासोबत मूळ प्रमाणपत्रे/दाखले पाठवू नयेत.**

(क) **अर्जावरील नोंदी भरण्याबाबत सूचना.**—(१) अर्जाच्या पहिल्या पानावरील (मुखपृष्ठावरील) माहिती संगणकावर स्कॅन होणार आहे. (२) अर्जाच्या पहिल्या पानावरील (मुखपृष्ठावरील) माहिती **ठळक काळ्या शाईने** इंग्रजी पहिल्या लिपीत (CAPITAL/BLOCK LETTERS)

व्यवस्थितपणे भरावी. (३) पान क्र. २ ते ४ वरील माहिती मराठीत भरावी. (४) अर्ज भरण्यासाठी निळ्या शाईचा अथवा लाल शाईचा वापर करू नये. (५) अर्जाची झेरॉक्स/फोटो कॉपी वापरू नये. (६) अर्जामध्ये " FOLD HERE ONLY " असे दर्शविलेल्याच ठिकाणी अर्जाची घडी घालावी. (७) नाव व पत्ता भरताना प्रत्येक शब्दानंतर एक चौकोन (BOX) रिक्त ठेवावा. (८) अर्जामध्ये आवश्यक त्या ठिकाणी फक्त अद्याक्षर/अंक वापरावा. (९) अर्जामध्ये फोटो चिकटविण्यासाठी ठेवलेल्या जागेमध्येच फोटो चिकटवावा. फोटो पिन अथवा स्टॅपल करू नये. (१०) फोटो चिकटविताना गम अथवा फेविकॉल फोटो बाहेर येणार नाही याची काळजी घ्यावी.

(ड) संगणक संस्करणामुळे आवेदनपत्रावर दिलेल्या पत्त्यातील बदलाची दखल प्रवेशपत्रे पाठविण्यापूर्वी घेतली जाणार नाही. म्हणून पत्त्यात बदल झाल्यास, उमेदवारांनी त्यांना आवेदनपत्रातील पत्त्यावर येणारी पत्रे नवीन पत्त्यावर परस्पर मिळतील अशी व्यवस्था करावी. नंतरच्या पत्रव्यवहारामध्ये उमेदवाराने आवेदनपत्रातील पत्त्यामध्ये बदल करण्याची खास विनंती केली तरच त्याची नोंद घेतली जाईल. परीक्षेनंतर अशा प्रकारचा बदल झाल्यास, तो न चुकता आयोगाला कळवावा. असे न केल्यास उमेदवारास कदाचित त्या पुढच्या सर्व संधी गमवाव्या लागतील, त्यास आयोग जबाबदार राहणार नाही.

**(इ) परीक्षेसाठी एकदा निवडण्यात आलेले परीक्षा केंद्र तसेच जातीचा अथवा वर्गवारी अथवा अपंग विषयक दावा यामध्ये मागाहून कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. म्हणून उमेदवाराने आयोगास आवेदनपत्र सादर करताना आपल्या निवडीचे परीक्षा केंद्र, अपंगत्वाचा दावा व जातीची वर्गवारी अचूक दर्शविली आहे याची खात्री करून घ्यावी. परीक्षेचा अर्ज करताना अपंगत्वाचे अथवा जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याची सबब सांगून उमेदवाराने अमागास अथवा इतर कोणतीही मागास वर्गवारी नमूद न करता आपली जी वर्गवारी आहे तीच वर्गवारी नमूद करून त्यापृष्टयर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

(फ) **अर्जाचे संगणक संस्करण स्कॅनरवर होणार असल्याने अर्जातील इंग्रजी माहिती पहिल्या लिपीत** (IN CAPITAL BLOCK) **काळ्या शाईच्या पेनाने अचूक भरावी. अर्जाचा नमुना कोणत्याही प्रकारे खराब होणार नाही, चुरगळणार नाही वा फाटणार नाही याची सर्वोतोपरी काळजी घ्यावी. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या झेरॉक्सप्रती अर्जावर दर्शविलेल्या विहीत जागी पीन अथवा स्टेपलने जोडाव्यात. पोस्टाने अर्ज पाठविताना अर्जामध्ये दर्शविलेल्या ठिकाणीच अर्जाची घडी करून अर्ज पाकिटात भरण्याची खास खबरदारी घ्यावी.**

**१४. शासकीय सेवेतील उमेदवारांनी अर्ज पाठविण्याची रीत** :—उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास त्यांनी विहित नमुन्यातील पूर्ण भरलेले **अर्ज परस्पर** आयोगाकडे पाठवावेत. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे/परीक्षेचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी आयोगाने निश्चित केलेला अंतिम दिनांक इत्यादि तपशील आपल्या कार्यालय/विभाग प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास अर्ज स्वीकारण्याच्या अखेरच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत तसे आयोगास परस्पर कळविण्याची विनंती आपल्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांस करावी. अर्ज विचारात घेतला जाण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही, हेही त्यांना कळवावे. तसेच ज्या उमेदवारांना त्यांना लागू असलेल्या सेवा शर्तीनुसार स्वत:च्या कार्यालय प्रमुखातर्फे बाहेरील पदांसाठी अर्ज पाठविणे आवश्यक असते. **अशा उमेदवारांनी आगाऊ प्रतीच्या स्वरुपात विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती, फोटो व फी सह वेळेवर पाठविल्यास त्यांचा तात्पुरता विचार केला जाईल. (अर्जाची झेरॉक्स प्रत स्वीकारली जाणार नाही) विहित मुदतीनंतर आलेला अर्ज जरी कार्यालयामार्फत पाठविला असला तरी विचारात घेतला जाणार नाही.**

१५. अर्जात हेतुपूरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन न करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेच्यावेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाच्या बाहेर अथवा परीक्षे नंतरही तसेच अन्य कोणतेही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडीना अनर्ह ठरविणे, काळ्या यादीत समाविष्ट करणे व प्रतिरोधित करणे (DEBAR) यांपैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच, प्रचलित कायदा व नियमाच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला असतील आणि उमेदवार शासकीय सेवेत असेल तर त्याला विभाग प्रमुखाकडून/शासनाकडून शासकीय सेवेतून बडतर्फ केले जाण्याची शक्यता आहे. तसेच, विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल आणि/किंवा इतर योग्य अशा शिक्षेला पात्र ठरेल.

१६. विहित मर्यादेत अर्ज आल्यास उमेदवारांची पात्रता तपासून उमेदवारांना परीक्षेस प्रवेश दिला जाईल. अर्जाची संख्या प्रमाणाबाहेर झाल्यास जे उमेदवार अधिसूचित केलेल्या अर्हतेच्या आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करतात असे समजून प्रस्तुत पदासाठीची अर्हता न तपासता त्यांना त्यांची प्रवेशासाठीची पात्रता तपासण्याच्या अटींच्या अधिन राहून परीक्षेला प्रवेश दिला जाईल व परीक्षेचे ठिकाण, तारीख व वेळ प्रवेशपत्राने कळविली जाईल, त्याचा परीक्षेतील प्रवेश तात्पुरताच राहील आणि त्याने अर्जात दिलेली माहिती ही खोटी वा चुकीची दिल्यामुळे किंवा पात्रतेच्या अटी पूर्ण करू शकत नसल्याचे वा अर्हताप्राप्त नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही वेळी आढळून आल्यास या परीक्षेतील त्याची उमेदवारी रद्द केली जाईल. याबाबत आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

यापूर्वी ओळखपत्रातील छायाचित्राइतक्या आकाराचे स्वत:चे अलीकडचे छायाचित्र प्रवेशपत्रावर विहित जागी घट्ट चिकटवून त्यावर विहित प्राधिकाऱ्यांचे साक्षांकन करून आणण्याबाबत उमेदवारास सूचना दिली जात असे. तथापि, प्रस्तुत परीक्षेपासून सदर पद्धतीत सुधारणा करण्यात आली

असून प्रवेशपत्राऐवजी प्रवेश प्रमाणपत्रे उमेदवारांना आयोगाकडून निर्गमित केली जातील. सदर प्रवेश प्रमाणपत्रात उमेदवाराने त्याच्या अर्जात चिकटविलेल्या फोटोचे व अर्जावरील सहीचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. ज्या उमेदवारांना मूळ प्रवेश प्रमाणपत्रे प्राप्त होणार नाहीत अशा उमेदवारांना आयोगाकडून दुय्यम प्रवेश प्रमाणपत्रे प्रदान केली जातील. त्यावर उमेदवाराने त्याचा फोटो चिकटवून त्या खाली अर्जावर केलेल्या सहीप्रमाणे सही करणे आवश्यक आहे तेव्हा मूळ/दुय्यम प्रवेश प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच उमेदवाराला परीक्षेस बसू दिले जाईल अन्यथा त्यास परीक्षेला बसू दिले जाणार नाही. **परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र उमेदवाराने स्वतःजवळ जपून ठेवावे.**

दिनांक१ फेब्रुवारी २००५ पर्यंत प्रवेशपत्र न मिळाल्यास त्यांनी मुंबई केंद्राच्या बाबतीत '' विक्रीवर भवन (जुनी इमारत), कक्ष-९०४, ९ वा मजला, सरदार बलवंतसिंह दोधी मार्ग (नेसबीट रोड), माझगाव, मुंबई ४०० ०१० '' येथील आयोगाच्या कार्यालयात व जिल्हाकेंद्रांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः जाऊन संपर्क साधावा. परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या यादीत त्याचे नाव असल्यासच त्यांना दिनाक २, ३, ४ फेब्रुवारी २००५ रोजी प्रवेशपत्रांची दुसरी प्रत देण्यात येईल. प्रवेशपत्राची दुसरी प्रत प्राप्त झाल्यानंतर टपालामार्फत यापूर्वीच आयोगाने पाठविलेले मूळ प्रवेशपत्र उमेदवारास प्राप्त झाले तर त्याने ते आयोगास परत पाठवावे.

प्रवेशपत्राची दुसरी प्रत परीक्षेच्या दिवशी म्हणजेच दिनाक ५ व ६ फेब्रुवारी २००५ रोजी उमेदवारांना देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांची नावे परीक्षेसाठी प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या यादीत नाहीत व त्याना त्यांचा अर्ज नाकारल्याचे पत्रही मिळाले नसेल अशा उमेदवारांनी त्यांना त्यांचा अर्ज मिळाल्याची आयोगाने दिलेली पोचपावती सादर केल्यास, त्यांना त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर आयोगाकडून त्यांच्या अर्जाचा शोध व इतर तपासणीच्या अधीन राहून तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. परंतु तपासणीमध्ये त्यांचा अर्ज नाकारला आहे किंवा अन्य कारणासाठी अपात्र आहे असे निदर्शनास आल्यास, त्यांना परीक्षेसाठी दिलेला तात्पुरता प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल वं आयोगाचा तो निर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहील. प्रवेशपत्राची दुसरी प्रत पोस्टाने पाठविण्याबाबत उमेदवाराने विनंती केल्यास, ती मान्य केली जाणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या पत्रांना उत्तरेही दिली जाणार नाहीत.

१७. **उमेदवारांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.** परीक्षेसाठी निर्धारित केलेल्या वेळेपूर्वी उमेदवारांनी संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. विलंबाबाबत कोणत्याही कारणाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही व या संबंधीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, परीक्षा झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही.

१८. **परीक्षेतील गैरप्रकार करणाऱ्यांना इशारा.—आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या प्रस्तुत परीक्षेत अथवा परीक्षेनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणे जसे प्रश्नपत्रिका फोडणे, बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करणे, दुसऱ्या उमेदवारांकडून मदत घेणे, इत्यादी, दुसऱ्या उमेदवारास मदत करणे, अथवा कोणत्याही प्रकारे आपली ओळख पटेल अशी कृती करणे तसा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या पण गैरप्रकार करण्याऱ्या व्यक्तींवर '' महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ मालप्रॅक्टीसेस ॲट युनिर्व्हसिटी, बोर्ड ॲन्ड अदर स्पेसिफाईड एक्झामिनेशन्स ॲक्ट, १९८२ '' खाली तसेच प्रचलित कायदा व नियमांच्या अधीन राहून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल. त्या व्यतिरिक्त संबंधित उमेदवारास सदर परीक्षेसाठी अथवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा व निवडीसाठी कायमस्वरुपी प्रतिरोधित (Debar) सुद्धा करण्यात येईल, याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१९. **प्रवास खर्चाबाबत.**—लेखी परीक्षेकरिता उमेदवारांनी निवडलेल्या परीक्षा केंद्रात परीक्षेच्या ठिकाणी उमेदवारांना स्वतःच्या खर्चाने हजर राहावे लागेल. तसेच मुलाखतीसाठी बोलाविलेले जे उमेदवार केंद्र/राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील स्वायत्त संस्था, मंडळे वा अन्यत्र कोठेही नोकरीस नसतील अशा उमेदवारांना ते मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरल्यासच रेल्वेचे दुसऱ्या वर्गाचे भाडे आणि जर रेल्वेने जोडलेली नसतील अशा दोन स्थानांमधील सर्वसाधारण बसचे भाडे देण्यात येईल. मात्र त्यांनी मध्य रेल्वेची अधिसूचना क्रमांक १३१/९५, दिनांक ३० ऑगस्ट १९९५ अन्वये जाहीर केलेल्या प्रवास भाड्याच्या ५० टक्के सवलतीचा फायदा घेऊ नये. उपरोक्त प्रवासखर्च प्रतिपूर्तीच्या सवलतीपैकी उमेदवारास एकाच सवलतीचा फायदा घेता येईल. राज्य शासनाच्या प्रवास खर्च प्रतिपूर्तीच्या सवलतीसाठी उमेदवाराला प्रत्यक्ष प्रवास केल्याच्या पुष्ट्यर्थ रेल्वेची/बसची तिकीटे पाठवली पाहिजेत.

२०. **लेखी परीक्षेचा निकाल.**—(अ) आयोगाद्वारे लेखी परीक्षेच्या विषयांपैकी एका/अनेक विषयांकरिता वेगवेगळे आणि/किंवा सर्व विषयांकरिता एकत्रित गुणाचे अर्हतामान ठरविण्यात येईल. हे अर्हतामान सर्व उमेदवारासाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/ उपवर्गासाठी तसेच महिला व अपंगासाठी वेगवेगळे असेल.

(ब) आयोगाने प्रस्तुत लेखी परीक्षेसाठी निर्धारित केलेल्या अर्हतामानाइतके किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या आणि प्रस्तुत अधिसूचनेतील अर्हता, अटी व शर्ती यांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनाच फक्त मौखिक व व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलविण्यात येईल. ही चाचणी १०० गुणांची असेल.

(क) लेखी परीक्षेच्या अर्हतामानांच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती बाबतचे ठिकाण, वेळ इत्यादि, तपशील उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

२१. **लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याचे वर्तमानपत्रातून बातमी म्हणून घोषित करण्यात येईल. सर्व विषयांना उपस्थित असलेल्या परंतु लेखी परीक्षांच्या अर्हतामानाच्या आधारे अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना गुणपत्रिका टपालाने पाठविण्यात येतील. मुलाखतीस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांचा निकाल मुंबई येथे आयोगाच्या कार्यालयातील फलकावर तसेच परीक्षा केंद्रावरील जिल्हाधिकारी कार्यालयामधील नोटीस बोर्डावरही लावण्यात येईल. अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर मुलाखतीस उपस्थित असलेल्या व मुलाखत झालेल्या प्रत्येक उमेदवारास त्याचे विषयवार गुण दाखविणारी गुणपत्रिका टपालाने पाठविण्यात येईल.**

२२. **गुणांची पडताळणी करणेबाबतची पद्धती**.—गुणपत्रिका निर्गमित केल्याच्या दिनांकापासून साधारणतः एका महिन्याच्या आत उमेदवारानी गुणांची पडताळणी करण्याकरिता गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतींसह अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. मात्र अर्जासोबत प्रत्येक विषयाला रु. ५०/- प्रमाणे रकमेचे कोर्ट फी स्टॅम्पस् किंवा " सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ४०० ००१ " यांच्या नावे रेखांकित केलेली आवश्यक त्या रकमेची भारतीय पोस्टल ऑर्डर जोडावी लागेल. प्रस्तुत परीक्षेत उमेदवारांच्या उत्तरपत्रिका व उत्तरपुस्तिकातील उत्तरांचे फेरमुल्यांकन ( Re-assessment ) कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही व याबाबतची उमेदवारांची विनंती आयोगाकडून विचारात घेतली जाणार नाही.

२३. **पसंतीक्रम बदलण्याची एक संधी**.—महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २००४ च्या लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या व प्रस्तुत अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता,अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना पाठविल्या जाणाऱ्या मुलाखतपत्रासोबत एक प्रपत्र पाठविण्यात येईल. त्याद्वारे मुलाखतीस बोलविलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या पदांच्या पसंतीक्रमात बदल करण्याची एक संधी दिली जाईल. उमेदवार पदांच्या पसंतीक्रमात बदल करू इच्छित असल्यास त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पदांचा सुधारित पसंतीक्रम विहित प्रपत्रात नमूद करून ते प्रपत्र मुलाखतीचे वेळी इतर प्रमाणपत्रांसह सादर करावे. पसंतीक्रमात बदल करावयाचा नसल्यास तसे प्रपत्रात स्पष्टपणे नमूद करावे. अशाप्रकारे पसंतीक्रम बदलण्याची **फक्त एकच संधी** उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल :—

(१) सुधारित पसंतीक्रम मुलाखतीच्या दिवशी देणे आवश्यक आहे.

(२) मुलाखतीच्या दिवसानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थित विचार केला जाणार नाही.

(३) सुधारित पसंतीक्रम मुलाखतीच्या दिवशी **मुलाखतीपूर्वी न दिल्यास** उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेला पसंतीक्रमच अंतिम समजण्यात येईल.

(४) उमेदवारांनी अर्जामध्ये अभियांत्रिकी सेवेच्या ज्या वर्गाकरिता व विभागाकरिता अर्ज करीत आहे त्या पदाचा पसंतीक्रम पदांसमोर इंग्रजी आकड्यात 1,2,3,4 असा दर्शविला नसल्यास, तसेच मुलाखतीच्या दिवशी पदासमोर पसंतीक्रम दर्शवून प्रपत्र सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

(५) सोबतच्या परिशिष्ट १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हतेच्या अटी पूर्ण न करणाऱ्या उमेदवारानी संबंधित पदासाठी अर्ज करू नये. आवश्यक अर्हता धारण न करणाऱ्या व अपंग उमेदवारांच्या बाबतीत शासनाने शासन निर्णयान्वये अपंग, अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदावरील नियुक्तीसाठी सदर परीक्षेमध्ये उमेदवारास मिळालेल्या गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस केली जाईल. उमेदवाराने प्रथम पसंती दिलेल्या पदासाठी त्याची निवड होऊ शकली नाही तर गुणवत्ता क्रमांकानुसार त्याने दिलेल्या पदांच्या दुसऱ्या-तिसऱ्या वा पुढील पसंतीप्रमाणे त्याची शिफारस करण्यात येईल. उमेदवाराने अंतिमतः दिलेल्या पसंतीक्रमानुसार आयोगाने त्याच्या नावाची एखाद्या पदासाठी शासनास शिफारस केल्यास त्याने आवेदनपत्रामध्ये वा विवरणपत्रात इतर पदांसाठी दिलेले पसंतीक्रम रद्दबातल होतील. ज्या पदांसाठी त्याची शिफारस केली आहे, ते पद त्या उमेदवाराने न स्वीकारल्यास अथवा अन्य कारणामुळे त्याची जर त्या पदावर नियुक्ती होऊ न शकल्यास त्याचा इतर पदांसाठी विचार केला जाणार नाही. अंतिम निकालाआधारे उपलब्ध पदांच्या संख्येइतक्या उमेदवारांचीच निवड केली जाईल.

२४. **परीक्षेचे अंतिम अर्हतामान**.—उपरोक्त लेखी परीक्षेस आणि " मौखिक व व्यक्तिमत्व चाचणी " मध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करून त्या आधारे सर्व संवर्गासाठी एकच किंवा प्रत्येक संवर्ग आणि/अथवा अपंग व महिला यांसाठी वेगवेगळे अर्हतामान आयोगाद्वारे निश्चित करण्यात येईल. हे अर्हतामान सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्गासाठी/उपवर्गासाठी तसेच महिला व अपंगासाठी वेगवेगळे असेल. ह्या अंतिम अर्हतामानानुसार अर्हता प्राप्त होणाऱ्या उमेदवाराचा परस्परात गुणवत्ताक्रम लावण्यात येईल.

२५. **प्रस्तुत परीक्षेत समान गुण धारण करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी** (Ranking) **ठरविण्याबाबत**.—महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २००४ ची शिफारस यादी तयार करताना परीक्षेमध्ये समान गुण धारण करणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी आयोगाद्वारे खालील तत्त्वांनुसार निश्चित करण्यात येईल :—

(१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवार धारण करीत असलेली उच्च शैक्षणिक अर्हता [त्यामध्ये विद्या वाचस्पती (डॉक्टरेट), संशोधन पदव्युत्तर पदवी अशा क्रमाने].

(२) उच्च शैक्षणिक अर्हतेमधील श्रेणी.

(३) उच्च शैक्षणिक अर्हता धारण करण्यात केलेले प्रयत्न (अटेम्प्ट)

(४) अंतिम दिनांकास धारण करीत असलेला विहित अनुभवाचा कालावधी.

(५) वय (वयाने मोठा असलेल्या उमेदवारास प्राधान्य).

(६) वरील निकष लावूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार लावण्यात येईल.

२६. **शिफारस**.—मागासवर्गीयांकरिता तसेच अपंग, महिला यांच्याकरिता असलेल्या आरक्षणाच्या अधीन राहून, तसेच विविध पदांसाठी उमेदवारांनी दिलेले पसंतीक्रम विचारात घेऊन प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालातील गुणवत्ताक्रमाप्रमाणे उपलब्ध जागांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल. शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात व जिल्हा केंद्रावरील जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयास सूचना फलकावर लावण्यात येईल व ती प्रसिद्ध होण्याची तारीख वर्तमानपत्रात बातमी म्हणून घोषित करण्यात येईल.

२७. परीक्षेत यश मिळाले म्हणजे उमेदवारांला नेमणुकीचा हक्क प्राप्त होत नाही. सार्वजनिक सेवेला उमेदवार योग्य आहे असे सर्व चौकशीनंतर आढळले तरच उमेदवारांची नेमणूक शासनाकडून करण्यात येईल. नेमणुकीसंबंधीच्या पत्रव्यवहाराची आयोगाकडून दखल घेतली जात नाही. त्यासाठी उमेदवारांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे.

२८. पुरुष उमेदवाराच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असतील तर तो उमेदवार शासकीय सेवेत नेमणुकीस पात्र ठरणार नाही. मात्र या गोष्टीस काही विशेष कारणे आहेत अशी शासनाची खात्री पटली तर त्या उमेदवाराला या तरतुदींपासून सूट देण्यात येऊ शकेल.

ज्या पुरुषाची एक पत्नी हयात आहे अशा पुरुषाशी ज्या स्त्री उमेदवाराने विवाह केला आहे अशी स्त्री उमेदवार शासकीय सेवेत नेमणूक होण्यास पात्र ठरणार नाही. मात्र असे करण्यास काही विशेष कारणे आहेत अशी शासनाची खात्री पटली तर अशा स्त्री उमेदवाराला त्या तरतुदीपासून सूट मिळू शकेल.

२९. नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना वैद्यकीय मंडळाकडून वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. वैद्यकीय मंडळाकडून सदर उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणित झाल्यानंतरच त्यांची संबंधित सेवेसाठी नियुक्ती केली जाईल. निवड झाल्यानंतर ताबडतोब उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे लागेल. नियुक्तीनंतर नियमानुसार त्यांना विभागीय परीक्षा व मराठी आणि हिंदीमधील भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

३०. पाटबंधारे व उर्जा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक जीएबी-१०७०/९-ई (१), दिनांक २० जानेवारी, १९७२ मधील नियम क्रमांक ९ च्या तरतुदीनुसार आवश्यकता भासल्यास वरील उमेदवारांना भारताच्या संरक्षण सेवेतील पदांवर किंवा भारताच्या संरक्षणासाठी निगडीत असलेल्या कुठल्याही पदावर देशात किंवा परदेशात प्रशिक्षणाचा कालावधी धरून ४ वर्षांपेक्षा कमी नसणाऱ्या कालावधीसाठी भारत सरकार ठरविल त्या शर्तीवर सेवा करावी लागेल परंतु त्यांच्या नियुक्ती नंतर १० वर्षांच्या कालावधी संपल्यानंतर किंवा सर्वसाधारणपणे त्यांच्या वयाची ४० वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही.

३१. जे उमेदवार प्रस्तुत परीक्षेमध्ये अंतिम निकालाआधारे विहित अर्हतामानानुसार शिफारस पात्र ठरतील अशा उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र. क्र. ६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ नुसार संगणकाच्या ज्ञानासंबंधी "D O E A C C" सोसायटीच्या अधिकृत "C C C" किंवा "O" स्तर किंवा "A" स्तर किंवा "B" किंवा "C" स्तरापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ यांची "M S C I T" परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

३२. एक वर्षाच्या अखंड सेवेनंतर सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीकरिता वर्गणी भरावी लागेल.

३३. आयोगाचे अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांचेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण आणण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास अशा उमेदवाराला आयोगाच्या निवडीपासून अपात्र ठरविण्यात येईल.

३४. उमेदवारीच्या संदर्भात उमेदवाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तींकडून आलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही व अशी पत्रे परस्पर दप्तर दाखल करण्यात येतील.

(दी. प्र. मिरजकर)
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

मुंबई,
दिनांक : १५ सप्टेंबर २००४.